(२९४१)

महाराष्ट्र शासन

क्रमांक : प्रवेश - २०१७/प्र.क्र.९१/एसडी-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३० मे, २०१७.

प्रति,

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य,
पुणे.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई विभाग, मुंबई

३) विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

विषय :- सन २०१७-१८ मधील इ. १२ वी प्रवेशाबाबत.
संदर्भ:- शासनाच्या समक्रमांकाचे दि. ६.५.२०१७ चे पत्र.

शासनाच्या संदर्भाधीन दि. ६.५.२०१७ च्या पत्रान्वये सन २०१७ -१८ मधील इ. १२ वी मध्ये कनिष्ठ महाविद्यालय बदलून देण्याचे कार्यवाही प्रचलित नियमाप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. सदर आदेश रद्द करण्यात येत आहे.

सदर पत्रान्वये आदेश देण्यात येत आहे की, मुंबई महानगर क्षेत्र व पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्र यामध्ये सन २०१७-१८ या वर्षाकरीता इ. १२ वी मध्ये महाविद्यालय बदलून देण्याची कार्यवाही आता महाविद्यालय स्तरावर करण्यात यावी. महाविद्यालय बदलून देण्याची कार्यवाही केवळ खालील कारणांसाठी करण्यात यावी.

i) सध्या विद्यार्थी शिक्षण घेत असलेले महाविद्यालय घरापासून लांब असणे
ii) पालकांची बदली होणे
iii) वैद्यकीय कारणास्तव राहत असलेल्या परिसरात कनिष्ठ महाविद्यालय बदलून मिळणे
iv) शाखा बदलून मिळणे
v) विद्यार्थ्यांचा राहण्याचा पत्ता बदलने.

तथापि, विद्यार्थ्यांनी महाविद्यालय बदलल्यानंतर मागील वर्षी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर तयार झालेल्या डाटाबेस मध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन घेण्याची कार्यवाही संबंधीत महाविद्यालय/विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी करणे आवश्यक राहील. डाटाबेस मध्ये आवश्यक बदल करुन याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

(डॉ. सुवर्णा खरात)
सहसचिव, महाराष्ट्र शासन